# भुयारीकरणाचा ४० वा टप्पा पूर्ण

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गावरील महालक्ष्मी मेट्रो स्थानकाच्या भुयारीकरणाचा ४०वा टप्पा पूर्ण करण्यात आला. मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ५३ किमी म्हणजेच ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी स्थानकादरम्यान भुयारीकरण करणे अतिशय आव्हानात्मक होते. हे भुयारीकरण पश्चिम रेल्वे मार्गावरील महालक्ष्मी आणि लोअर परेल रेल्वे स्थानकांच्या दरम्यान रेल्वेमार्गाखालून केले आहे. योग्य ती खबरदारी घेत हे काम पूर्ण केल्याचे मुंबई मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी सांगितले.